## वाढदिवस शुभेच्छा





**गोविंद शिरुळे**
माजी नगराध्यक्ष,
पारोळा

मान्यवरांच्या वाढदिवसापूर्वी एक दिवस आधी हितचिंतकांनी खालील ई-मेल आयडीवर संपूर्ण नाव छायाचित्रासह माहिती पाठवावी.
deshdootmidc@gmail.com



जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट

**भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक**

लैगींक समस्या, गुप्तरोग

शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीपः रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान

**डॉ.मंशा डिस्पेन्सरी**
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१



भोंदू वैद्यांपासून सावध रहा! । रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)


▌उत्साह आणि अभिमानाने भरलेला सोहळा ▌ऐतिहासिक क्षणाची आठवण, जिल्हाभरात आनंदोत्सव
▌पारंपरिक वेशभूषा, लेझीम, ढोल-ताशांचा गजर ▌विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पुरातत्त्व प्रदर्शन आणि व्याख्याने

# शिवराज्याभिषेक दिन सोहळा



### विद्यापीठात शिवज्योत रॅली

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आज दि. ६ जुन रोजी सकाळी ८ वाजता विद्यापीठात कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांच्या हस्ते शिवज्योत प्रज्वलीत करुन रॅलीला प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी रासेयो संचालक डॉ.सचिन नांद्रे, सल्लागार समिती सदस्य डॉ.संजय शिंगाणे, डॉ.विशाल देशमुख, के.पी.दांडगे, मनोज इंगोले, कक्ष अधिकारी प्रविण चंदनकर यांची उपस्थिती होती. शिवज्योत रॅली विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासुन सुरु होऊन प्रशासकिय इमारती जवळ आल्यानंतर शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या रॅलीमध्ये समाधान पाटील, कक्ष अधिकारी अनिल पाटील, जितेंद्र शिंदे, संजीव पाटील, शिवाजी पाटील, विलास, वैभव व रासेयो विद्यार्थी विद्यार्थीनी स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला.



**जळगाव ।** इतिहासाच्या पानावर, रयतेच्या मनावर, मातीच्या कणावर आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज . शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शहरातील विविध शाळा,सामाजिक संस्थातर्फे मानाचा मुजरा करण्यात आला. शिवराज्यभिषेक दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात शिवज्योत रॅली काढण्यात आली.



### एच.जी.एन.औद्योगिक प्रशिक्षण संस्था

इकरा एज्युकेशन सोसायटी संचालित औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मेहरूण येथे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या यंत्रांचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. याप्रसंगी इकरा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष करीम सालार, सचिव एजाज मलिक, वहाब मलिक तसेच चेअरमन मजीद जकेरिया उपस्थित होते. शिवराज्यभिषेक दिनानिमित्त वक्ते रागीब अहमद यांनी कुटुंब प्रबोधन या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन जुबेर शेख यांनी तर उपस्थितांचे आभार जहूर शेख यांनी मानले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या नाविन्यपूर्ण यंत्रांचे प्रदर्शन यावेळी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.

## थोडक्यात...

### जळगाव आगाराचे वेळापत्रक कोलमडले



**जळगाव ।** 'प्रवाशांच्या सेवेसाठी' असे ब्रीदवाक्य मिरवणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या जळगाव परिवहन आगाराचे वेळापत्रक कोलमडलेले असल्याचे सध्या पाहायला मिळत आहे. अनेक लांब पल्ल्याच्या फेऱ्या उशिरा सुटताना दिसतात. याबाबत वाहतूक नियंत्रकांकडे चौकशी केली असता बस तयार नाही, ड्रायव्हर आला नाही, कंडक्टर आला नाही, थोड्याच वेळात सुटेल, अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात येतात. वास्तविक पाहता ज्या बस चालकाची किंवा वाहकाची ड्यूटी ठराविक वेळेला लावलेली असते. त्याने आपल्या ड्युटीच्या वेळी आगारामध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. परंतु चालक, वाहकांमध्ये शिस्त नसल्यामुळेच जळगाव परिवहन आगारातील बसेस उशिरा सुटत असल्याचे दिसून येते. याचा प्रवाशांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागत आहे. आगारातून सुटणाऱ्या बसेस अनेक वेळा अचानक रद्द करण्याचे प्रकार देखील घडत असतात. गुरुवारी (दि. ६) सकाळी जळगाव - अंकलेश्वर ही बस ९ वाजताची वेळ असताना देखील १० वाजून १५ मिनिटांनी तब्बल १ तास उशिराने जळगाव बस स्थानकातून सुटली. या प्रकारात लवकर सुधारणा व्हावी अशी अपेक्षा प्रवाशांनी केली आहे.

## वीज सुरक्षा रॅलीत कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**जळगाव । प्रतिनिधी**

महावितरणचा वर्धापन दिनानिमित्त १ जून ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह होत असून त्यानुसार गुरुवारी जळगाव परिमंडलातील सर्वच विभागीय स्तरावर वीज सुरक्षा रॅलीज काढण्यात आल्या. जळगाव शहर व ग्रामीण विभाग, भुसावळ, चाळीसगाव, धरणगाव, मुक्ताईनगर, पाचोरा, सावदा, धुळे ग्रामीण, धुळे शहर, दोंडाईचा, नंदुरबार शहर व ग्रामीण, शहादा विभागात काढण्यात आलेल्या रॅलीत हजारो अधिकारी-कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

मुख्य अभियंता आय.ए.मुलाणी यांच्या निर्देशानुसार, जळगावचे अधीक्षक अभियंता विनोद पाटील, धुळ्याचे निरज वैरागडे, नंदुरबारचे अधीक्षक अभियंता सायस दराडे यांनी व त्या त्या विभागाचे कार्यकारी अभियंत्यानी रॅलीत भाग घेतला. रॅलीज मध्ये संबंधित विभागातंर्गत असणाऱ्या उपविभाग व शाखा कार्यालयातील कर्मचाऱ्यांनीही भाग घेतला होता.

कर्तव्यावर असतांना सुरक्षा साधनांचा वापर करणे, विजेचा अधिकृतपणानेच वापर करणे, कर्मचाऱ्यांसह नागरिक व वीज ग्राहकांनी विजेशी जबाबदारी व सजगपणे व्यवहार करणे, आपघात टाळणे आदी मुद्यांकडे रॅलीतून सर्वांचे लक्ष वेधण्यात आले.

धरणगाव विभागात शासकीय तंत्रनिकेतन मध्ये सेफ्टी सेमिनार घेऊन विद्यार्थ्यांना वीज सुरक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. विभागीय स्तरावर पार पडलेल्या रॅलीजच्या कार्यक्रमांच्या यशस्वीतेसाठी मानव संसाधन विभाग आणि वित्त व लेखा विभागातील कार्मचाऱ्यांनीही सहकार्य केले.

## शकुंतला आयटीआयमध्ये शिवराज्याभिषेक दिन

**जळगाव ।** शकुंतला आयटीआयमध्ये शिवराज्याभिषेक दिन निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चित्रफिती द्वारे मार्गदर्शन, तसेच औ.प्र.संस्था प्रवेश प्रक्रिया याचे व्हीडीओ प्रशिक्षणार्थ्यांना दाखविण्यात आले त्या नंतर उपशिक्षक अरविन्द राजपुत यांचे पर्यावरण सरक्षण या विषयावर व्याख्यान झाले. सदर प्रसंगी दीपक सराफ, प्राचार्य अनिल नारखेडे तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पीरिपाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी शांताराम अहिरे

**जळगाव ।** प्रा.जोगेंद्र कवाडे नैतृत्वाधिन पीपल्स



रिपब्लिकन पार्टीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते ॲटो-रिक्षा चालक मालकसंघटनेचे शांताराम अहिरे यांची नियुक्ती करण्यात आली. जिल्हाध्यक्ष राजुभाई मोरे यांनी नियुक्तीपत्र देवून त्यांची नियुक्ती केली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## भारतीय जनता पार्टी आक्रमक



**जळगाव ।** शिवसेना खासदार संजय राऊत यांनी ना. गिरीश महाजन यांच्याविषयी केलेल्या 'त्या' बेताल वक्तव्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या जळगाव जिल्हा महानगराच्या वतीने आक्रमक होत. खासदार संजय राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध करत शहरातील कोर्ट चौकात येथे भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र येत संजय राऊत यांच्या पुतळ्याचे दहन केले.

जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी यांनी यावेळी महाराष्ट्राचे संकट मोचक, ना. गिरीश महाजन यांच्याबद्दल संजय राऊत यांनी बेताल वक्तव्य केले. ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संस्कार, संस्कृती काढतात, त्यांनी आधी त्यांची स्वतः ची संस्कृती, संस्कार प्रथम पाहावेत. आम्ही संजय राऊत यांच्या वक्तव्याचा निषेध म्हणून केवळ त्यांच्या पुतळ्याचे दहन केले आहे, भविष्यात जर त्यांनी पुन्हा असे केले तर ते जळगावात आले तर आम्ही त्यांच्या तोंडाला काळे फसल्याशिवाय राहणार



नाही असा इशारा त्यांनी दिला. यावेळी आमदार सुरेश भोळे जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, सदाशिव ढेकळे, विशाल त्रिपाठी, भगत बलानी, अजित राणे, राजू मराठे, जितेंद्र मराठे, भरत सपकाळे, रेखा कुलकर्णी, कांचन सोनवणे, संगीता पाटील, विनोद मराठे, आनंद सपकाळे यांच्यासह पदा अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# जागतिक पर्यावरण दिन



### बहिणाबाई विद्यालय

बहिणाबाई विद्यालयात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग काळे यांच्या हस्ते दहा वृक्ष लागवड करून साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे, समन्वयक प्रतिमा खडके, डॉ. प्रतिभा राणे, स्वाती कोल्हे , राजेश वाणी, संतोष पाटील, दिनेश चौधरी, विशाल पाटील, चंद्रकांत पाटील, शंकर चव्हाण, रोशनी सुतार, नेहा भोई यांच्यासह विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. सामाजिक वनीकरणाचे लागवड अधिकारी समाधान सोनवणे ,संभाजी पाटील, अमोल ढोबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील उपक्रम राबविण्यात आला. यावेळी पर्यावरणीय समस्यांवर चर्चा करण्यात आली.

### रायसोनी महाविद्यालय

येथील जी. एच. रायसोनी महाविद्यालयात 'विश्व पर्यावरण दिन' उत्साहात पार पडला. याप्रसंगी महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापकांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करतांना संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी पर्यावरणाचे महत्व पटवून दिले 'एक व्यक्ती एक झाड' ही संकल्पना राबवली पाहिजे. प्लॅस्टिकचा वापर कमी करणे, ऊर्जेची बचत करणे, पाण्याचा योग्य वापर करणे, पर्यावरणपूरक सवय लावून घेणे व इतरांना पर्यावरणाबद्दल प्रोत्साहित करणे, असे नमूद त्यांनी यावेळी नमूद केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डीन प्रा. डॉ. संजय शेखावत, प्रा. डॉ. मुकुंद पाटील, प्रा. डॉ. शंतनू पवार, प्रा. डॉ. सोनल पाटील, प्रा. डॉ. तुषार पाटील, प्रा. डॉ. स्वाती पाटील, प्रा. डॉ. योगिता पाटील, प्रा. कल्याणी नेवे यांचे सहकार्य लाभले.





### जिजामाता माध्यमिक विद्यालय

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त न्यू जागृती मित्र मंडळ संचलित जिजामाता माध्यमिक विद्यालय हरी विठ्ठल नगर जळगाव या विद्यालयात राष्ट्रीय हरित सेना उपक्रमांतर्गत पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला. त्यावेळी शालेय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करतानो मुख्याध्यापक राजेंद्र खोरखेडे, महाराणा विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय चौधरी, प्रा.संजय पाटील, जळगाव रोटरी गोल्ड सिटी रो . निलेशजी जैन,किशोर पाटील, दिनेश सोनवणे, योगेश पवार, प्रशांत मडके उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक यांनी पर्यावरण दिनाचे महत्त्व विशद केले.

### पवन चॅरिटेबल ट्रस्ट

पवन चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित परिसंवादात प्लास्टिक पुनर्वापरास प्रोत्साहन द्यावे तसेच प्लास्टिकच्या अंत कायम झाला पाहिजे. अशी चर्चा करण्यात आली. असून जगातील ४५० दशलक्ष टन इतकी प्लास्टिकची निर्मिती होत असते त्यापैकी दोन तृतीयांश प्लास्टिक हे मायक्रो प्लास्टिक असते याचे कचऱ्यात रूपांतर होऊन ते नद्या, नाले, समुद्र, तळी ,पाण्याचे सरोवर यात समाविष्ट होते नंतर मानवी अन्नामध्ये त्याचा समावेश होतो. यामुळे असाध्य रोगांचा प्रादुर्भाव यामुळे होतं असतो असे पर्यावरण पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ. विलास नारखेडे यांनी यावेळी केले. परिसंवादात रघुनाथ राणे,लक्ष्मीकांत महाजन, प्रवीण पाटील, वन अधिकारी, समाधान सोनवणे, अमोल ढोबळे, सलाउद्दीन पिंजारी यांनी मत व्यक्त केले. प्रवीण सोनवणे,राजू फालक, लीलाधर नारखेडे, पवन नारखेडे यांनी परिसंवादात सहभाग नोंदवला

### भाजप छत्रपती शिवाजी महाराज मंडळ



भाजप छत्रपती शिवाजी महाराज मंडळ क्रमांक १ तर्फे शहरात पर्यावरणदिनानिमित्त पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्याचा संदेश वृक्षवाटप उपक्रमातून देण्यात आला. याप्रसंगी श्री मोटर्सचे संचालक सचिन चौधरी, महानगर उपाध्यक्ष तथा पर्यावरण जिल्हा संयोजक राजू मराठे, राहुल वाघ, संजय शिंदे, निलेश पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच, उमेश देशपांडे, हर्षल सपकाळ, संजय सोनवणे, तुषार सूर्यवंशी, जयवंत चव्हाण, विनय चौधरी, विनोद साळुंखे, अशोक घाडगे, राहुल संकत, शुभम विंचवेकर, पिंटू सपकाळे आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## जैन हिल्स येथे पर्यावरण दिन उत्साहात



गांधी रिसर्च फाउंडेशन आणि जैन इरिगेशन सिस्टीम्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जैन हिल्स परिसरात, तसेच जैन प्लास्टिक पार्क बांभोरी येथे वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम राबविण्यात आला. तसेच सन २०२४-२५ या वर्षात शिरसोली रस्त्याच्या दुतर्फा एकूण १३६३ झाडांची लागवड यशस्वी करण्यात आली आहे. या उपक्रमात सुरेंद्र वाणी, मोहन गाढे, निलेश चौधरी, राम घोरपडे, इरफान पिंजारी, भूपेश व्यास, सखाराम ठाकरे, रुपेश महाजन, प्रमोद नारखेडे, चेतन महाजन, राजेश चव्हाण, कामिनी धांडे, अजय ढेकळे, आरती व्यास, सुरजकुमार नेमाडे यांनी सहभाग घेतला.









cmyk